महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 443
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- २४.०६.२०२१

*निकाल प्राधान्य/तातडीचे*

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत...**

**संदर्भ :-**
१. **शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२, दिनांक २८.०५.२०२१**
२. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य परीक्षा/३३७ दि. ०१.०६.२०२१.**
३. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप / ३७१ दि. १०.०६.२०२१.**
४. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप / ४१४ दि. १८.०६.२०२१.**
५. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप / ४३२ दि. २३.०६.२०२१.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी मुल्यमापन कार्यपध्दतीबाबतच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशिल, सूचना व वेळापत्रक मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले असून त्याची कार्यपध्दती आपणांस अवगत करण्यात आलेली आहे.

सर्व माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य वितरण केंद्राकडे दि. **२५.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१** या कालावधीमध्ये जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि संदर्भ क्र ५ च्या पत्रामधील तांत्रिक सुचनेप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये (इ. १० वीचे) गुण भरणेचा कालावधी दिनांक **२३.०६.२०२१ ते ०२.७.२०२१** असा वाढविण्यात आला असलेमुळे सर्व माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य वितरण केंद्राकडे दि. **०१.०७.२०२१ ते ०२.०७.२०२१** या कालावधीमध्ये आपल्या शाळेच्या संबंधित वितरण केंद्रावर जमा करण्याची दक्षती घ्यावी. या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत निकाल व साहित्य वितरण केंद्रावर स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपरोक्त **संदर्भ क्र ५** च्या पत्रामधील तांत्रिक सुचनेमधील खालील सुचनांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

१. संगणक प्रणालीमध्ये नमूद केलेल्या विषयात बदल अथवा विषयातील सूट यामध्ये दुरुस्ती असल्यास सदर विषयासमोरील गुणांच्या सर्व रकाण्यामध्ये MM असे दर्शवावे. सदर दुरुस्तीचा तपशिल/बदललेल्या विषयाचे गुण व इतर तपशिल संबंधित विभागीय मंडळास परिशिष्टामध्ये नोंदवून वेगळया पाकीटात पुढील कार्यवाहीसाठी जमा करावे.



D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank

२. संगणक प्रणालीमध्ये माहिती भरताना नियमित खाजगी विदयार्थी, नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी म्हणून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या एखादया विदयार्थ्याकडे जर इ. ५ वी ते इ. ९ वी या इयत्तांमधील ( लागू असल्याप्रमाणे अंतिम इयत्तेच्या ) गुणपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध नसेल तर सदर विदयार्थ्याच्या परिशिष्टातील संबंधित रकान्यात तूर्त MM असे दर्शवावे. सदरचा तपशिल प्राप्त करुन घेऊन संबंधित विभागीय मंडळास परिशिष्टामध्ये नोंदवून वेगळया पाकीटात पुढील कार्यवाहीसाठी जमा करावे.

३. अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने उशिरा आवेदनपत्र भरल्याने अथवा अन्य कारणाने, ज्या विदयार्थ्याचा बैठक क्रमांक व इतर माहिती संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध नसेल अशा विदयार्थ्याचा अतिरिक्त बैठक क्रमांक विभागीय मंडळाकडून प्राप्त करुन घेण्यात यावा.सदर विदयार्थ्याचे गुण/श्रेणी/अन्य तपशिल बैठक क्रमांकासह परिशिष्टमध्ये भरण्यात यावेत व सिलबंद पाकीटातून विभागीय मंडळाकडे जमा करावे.अशा अतिरिक्त बैठक क्रमांकाबाबत संबंधित विभागीय मंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**वरील ३ मुदयातील सुचनेप्रमाणे आपल्या शाळेतील अशा विदयार्थ्याची माहिती व गुणांची पाकीटे स्वतंत्र तयार करुन वितरण केंद्रावर जमा न करता ती पाकीटे मंडळ कार्यालयात समक्ष हस्तपोच जमा करावी.**

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव** - सर्व वितरण केंद्र प्रमुख

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank